स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत लोकप्रशासन विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधन विषय

“महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा”

संशोधक

पोपलाईत शालिनी संतराम

रा.हाळी ता.उदगीर जि.लातूर

मार्गदर्शक

डॉ.अमोल प्रभाकर काळे

लोकप्रशासन विभाग

पीपल्स कॉलेज, नांदेड

संशोधन केंद्र

नेताजी सुभाषचंद्र महाविद्यालय, नांदेड

मे - २०१९

"महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा अभ्यास : विशेष संदर्भ मराठवाडा"

प्रस्तावना

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा दुसरा महत्त्वपूर्ण प्रकार महानगरपालिका होय. मोठ्या शहरांच्या किंवा महानगरांच्या स्थानिक प्रशासनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी नगरपालिकांची स्थापना करण्यात आली आहे. शहरातील विकासाच्या प्रक्रियेतील नगररचनेचा तसेच त्यातील प्रशासनाच्या व्यवस्थेचा उगम सिंधू संस्कृतीतील मोहोंजोदरो, हडप्पा या शहरामधून पहायला मिळतो. नागरी प्रशासनाची सुरुवात मनुस्मृती, रामायण, महाभारत काळात झालेली दिसून येते. मॅगेस्थेनिसच्या 'इंडिका' या ग्रंथातून भारतातील प्राचीन नगर प्रशासनासंबंधी काम केलेले दिसून येते. कौटिल्याने त्याच्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथातूनदेखील नागरी अधीक्षकाचा उल्लेख केलेला आहे. मोगल कालखंडात नगराचे प्रशासन कोतवालांच्या नियत्रंणाखाली चालत असे. देशातील पहिली महानगरपालिका ९ सप्टेंबर १६८८ रोजी मद्रास येथे स्थापन झाली. (सध्याचे नाव ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशन)[१]

ब्रिटिशपूर्व कालखंडात १७९३ च्या तिसऱ्या चार्टर ॲक्टनुसार कलकत्ता व मुंबई या शहरात महानगरपालिका स्थापन झाली. संपूर्ण भारतासाठी १८५० साली म्युनिसिपल कायदा संमत केला. १८७० मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड मेयोने नागरी स्थानिक स्वशासनासंबंधी पहिला कायदा केला. भारतातील दुसरी महानगरपालिका कलकत्ता येथे १८७६ मध्ये स्थापन करण्यात आली. भारतातील तिसरी आणि महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका १८८८ मध्ये मुंबई येथे स्थापन करण्यात आली. मुंबई लोकल बोर्डाची स्थापना १८८४ मध्ये झाली. १९०१ मध्ये मुंबई जिल्हा नगरपालिका कायदा संमत करण्यात आला. स्वातंत्र्यप्राप्तीवेळी कलकत्ता, मुंबई व त्रिवेंद्रक या ४ ठिकाणी महानगरपालिका अस्तित्वात होत्या. १९४९ मध्ये बॉम्बे प्रोव्हिन्शिअल म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट संमत होऊन पुणे व अहमदाबाद महानगरपालिका अस्तित्वात आल्या.[२] १९५८ मध्ये दिल्ली महानगरपालिका अस्तित्वात आली. १९६५ मध्ये महाराष्ट्र नगरपालिका, महानगरपालिका अधिनियम १९६५ संमत करण्यात आला. महाराष्ट्रातील २७

वी व सर्वात नवीन महानगरपालिका पनवेल (२०१६) आहे. सर्वात जास्त महानगरपालिका ठाणे जिल्ह्यात आहेत.

महाराष्ट्रातील महानगरपालिकांचा कारभार पुढील कायद्यानुसार चालविला जातो. मुंबई महानगरपालिका १८८८, नागपूर महानगरपालिका अधिनियम १९४८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, मुंबई व नागपूर वगळता महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकांसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार कार्य चालते.[३]

मराठवाडा हा महाराष्ट्राच्या गोदावरी नदीच्या खोऱ्यात आणि आसपास वसलेला एक प्रदेश आहेत. आठ जिल्ह्यांचे औरंगाबाद हे या विभागाचे मुख्यालय आहे. महाराष्ट्रातील १६.८४ टक्के लोकसंख्या या प्रदेशात राहते. पैठणचे सातवाहन ते देवगिरीचे यादव हा ऐतिहासिक काळ मराठवाडा विभागाच्या राजकीय उत्कर्षाचा काळ होता. औरंगाबाद प्रशासकीय विभागात औरंगाबाद, नांदेड-वाघाळा, परभणी आणि लातूर ०४ महानगरपालिका आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेची स्थापना १९८४ मध्ये झाली असून नांदेड-वाघाळा १९९७, लातूर आणि परभणी २०११ साली झाली आहे.[४]

समस्यासूत्रण

सदर संशोधनाचा उद्देश मराठवाड्यातील महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा अभ्यास करणे हा आहे. यामध्ये महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या कामाचे प्रारूप, संघटनात्मक रचना, अधिकार, भूमिका पार पाडत असताना नेमक्या कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, त्यांच्या समस्यांचे स्वरूप काय असते, या समस्यांसदर्भात शासन कशा प्रकारे उपाययोजना करते या सर्व विषयांवर अध्ययन करणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.[५]

संशोधन पद्धती

सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीप्रमाणेच या संशोधनासंदर्भात वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

१) प्राथमिक स्त्रोत

संशोधक स्वत: उपस्थित राहून प्रत्यक्ष अवलोकन (Direct Observation), अनुसूची (Schedule), मुलाखती (Interview) व प्रश्नावली (Questionnaire)

इत्यादीच्या माध्यमातून माहिती व आकडेवारी संकलित करण्यात येऊन त्याचे विश्लेषण करण्यात येईल.

२) द्वितीय स्त्रोत

द्वितीय तथ्य सामग्रीत प्रकाशित दस्तऐवजांचा वापर करण्यात येईल. ज्यात विविध पुस्तके, मासिके, विशेषांक, सार्वजनिक प्रलेख, शासकीय व अशासकीय संस्थांचे अहवाल त्याचबरोबर दैनिके व इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीच्या आधारे तथ्य संकलित करण्यात येतील.

तथ्य संकलन

प्रस्तुत अभ्यास विषयाचे संशोधन करत असताना तथ्य संकलित करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोत अशा दोन्हीही प्रकारच्या स्त्रोतांचा आधार घेतला जाईल.

नमुना निवड

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी मराठवाड्यातील महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांना संशोधनाच्या अनुषंगाने विविध प्रश्न विचारुन मुलाखत अनुसूची भरून घेण्यात येईल. ०४ महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा यात समावेश असेल.

अध्ययन क्षेत्र

प्रस्तुत अभ्यासासाठी मराठवाड्यातील महिला कर्मचाऱ्यांचा अभ्यास हा विषय निवडला असून मराठवाड्यात ०८ जिल्हे आहेत. मात्र ०४ जिल्ह्यातच महानगरपालिका अस्तित्वात आहे. प्रस्तुत संशोधनात औरंगाबाद, नांदेड-वाघाळा, लातूर आणि परभणी या ०४ जिल्ह्यातील महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या अभ्यासापुरते हे संशोधन मर्यादित आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये

१) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

२) महानगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधी व महिला कर्मचाऱ्यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करणे.

३) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप अभ्यासणे.

४) महानगरपालिकेतील महिला कर्मचा-यांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) महानगरपालिकेतील महिला प्रशासकीय पातळीवर राबविण्यात येणाऱ्या योजना, सुविधांचा अभ्यास करणे.

गृहितके

१) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचे मनोबल निम्न दर्जाचे असते.

२) महानगरपालिकेतील महिला कर्मचारी जनतेशी प्रभावीपणे सुसंवाद प्रस्थापित करतात.

३) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांवर कौटुंबिक व कार्यालयीन हा दुहेरी तणाव येतो.

४) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांमधील श्रेणी एक व श्रेणी दोनच्या तुलनेत श्रेणी तीन व चार यांना मिळणारी वागणूक भिन्न स्वरूपाची असते.

५) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांना महिला म्हणून विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

६) महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी प्रशासकीय पातळीवर राबविण्यात येणाऱ्या योजना, सुविधांचा लाभ मिळतो.

संशोधन साहित्याचा आढावा

१) डॉ.दिपाली सक्सेना (२०१२)

यांच्या 'महिला सशक्तीकरण सिद्धांत और वास्तविकता' या रोशनी पब्लिकेशन, कानपूरने प्रकाशित केलेल्या पुस्तकात महिलांचा विकास कोणत्या प्रकारे करता येईल व महिलांसाठी ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे विकास कसा करता येईल तसेच नागरी प्रशासन व्यवस्थेत कर्मचारी समस्यांचे स्वरूप कसे आहे तसेच कर्मचारी वर्ग कसा भरती केला जातो याचे विवेचन केले गेले आहे.

२) प्रा.सौ.माधवी कवी (२००५)

यांनी 'महिला कल्याण आणि विकास' या विद्या प्रकाशनने प्रकाशित केलेल्या ग्रंथात विसाव्या शतकापर्यंतचे महिलांचे स्थान, महिला विकासाच्या विविध योजना, सामाजिक

परिवर्तन, कायदे विज्ञान व तंत्रविद्येचा महिला जीवनावरील झालेला परिणाम व प्रभाव याविषयी लिखाण केले आहे.

३) रमा शर्मा व एम.के. मिश्रा (२००९)

यांच्या 'महिला विश्वकोष' या ग्रंथात महिलांचे अधिकार यावर या पुस्तकात भाष्य केले आहे. तसेच महिलांना सरकारी नोकरीत कोणकोणत्या समस्या आहेत याविषयीच्या माहितीचे संकलन केले आहे.

४) एकंबेकर पंचशील केशवराव (२००६)

यांच्या 'महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ- नांदेड-वाघाळा नगरपालिका नांदेड' या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास सादर केलेल्या लोकप्रशासन विषयातील शोधप्रबंधात महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे.

५) केंद्रे श्रीकांत नामदेव (जुलै २०१२)

यांच्या 'पोलीस प्रशासनातील कर्मचारी वर्गाच्या समस्या : विशेष संदर्भ मराठवाडा-एक अभ्यास' या पीएच.डी. शोधप्रबंधात पोलीस प्रशासनातील कर्मचारी वर्गाच्या समस्यांचा अभ्यास केला आहे.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणामध्ये महानगरपालिकांचा इतिहास, कार्य, अधिकार, प्रशासकीय संरचना, वित्तीय व्यवस्था, राजकीय पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे सहसंबंध, महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचे संख्यात्मक प्रमाण यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

या प्रकरणामध्ये संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाचा अभ्यास विषय, अध्ययन क्षेत्र, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, संशोधन आराखडा, नमुना निवड पद्धती, तथ्य संकलन, तथ्य

विश्लेषण, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, तथ्य संकलनातील अनुभव, संशोधन पद्धतीशी संबंधित विविध प्रकाशित- अप्रकाशित साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास

शोधप्रबंधाच्या या तिसऱ्या प्रकरणात निवड केलेल्या ०४ महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : महानगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधी व महिला कर्मचाऱ्यांचा परस्परसंबंध

या प्रकरणात महानगरपालिकेतील महिला लोकप्रतिनिधी व महिला कर्मचाऱ्यांचा परस्परसंबंधांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप

पाचवे प्रकरणात औरंगाबाद, नांदेड-वाघाळा, परभणी आणि लातूर या चार महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरूप कसे आहे याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांच्या समस्या

महानगरपालिकेतील महिला कर्मचारी म्हणून कार्य करत असताना कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते याचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण सातवेः महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांसाठीच्या योजना/उपक्रम व निष्कर्ष

महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या आरोग्यविषयक सुविधा, वेतनवाढी, पेंशन, अपुरे वेतन, ७४ व्या घटना दुरुस्ती कायद्याचा लाभ इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१) प्रा.व्ही.बी. पाटील (२०१५), महाराष्ट्रातील पंचायत राज व स्थानिक संस्था, के सागर पब्लिकेशन, पुणे

२) प्रा.गोविंद यमलवाड (२००१), स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००१

३) रंजन कोळंबे (२०१८), पंचायतराज, भगीरथ प्रकाशन, पुणे

४) ए.बी. सवदी (२०१४), द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पुणे,

५) डॉ.शेवाळे, डॉ.पवार, प्रा.शबनम (२०१६), संख्यात्मक तंत्रे व संशोधन पद्धती, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

६) डॉ.कराडे बी.एम. (२०११), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

७) भारत में पंचायती राज (२००९), कॉलेज बुक डिपो, ८३, त्रिपोलिया, जयपूर

८) पाटील बी.बी. (१९९९), भारतीय शासन, फडके प्रकाशन, कोल्हापूर

मार्गदर्शक संशोधक

डॉ.अमोल प्रभाकर काळे **पोपलाईत शालिनी संतराम**